अ. ९१५४२ नं. ९३७०३

पालांच्या योगक्षेमाची व शा...
सर्व विला...

# महाराष्ट्र ग्रंथालय परिषद

ग्रंथालय ८८०८

## अधिवेशन तिसरें, डिसेंबर १९५१ अलिबाग सार्वजनिक वाचनालयाचे विद्यमानें

## म. म. द. वा. पोतदार यांचें अध्यक्षीय भाषण.

महाराष्ट्र-ग्रंथालय परिषदेचें हें तिसरें अधिवेशन होय. या अधिवेशनाच्या अध्यक्षपदीं माझी योजना आपण केली तिचें समर्थन मला माझ्या मनाशीं विचार करितां कठीणच वाटलें! मी ग्रंथांचा भोक्ता आहे आणि ग्रंथांचा संग्रह करावयाचा छंद मला बाळपणापासून आहे. हर प्रयत्नानें मी हा संग्रह अद्यापि चालू ठेविला आहे. एखाद्या छोट्याशा ग्रंथालयाचें स्वरूप त्याला प्राप्त झाल्यासारखें दिसतें. तें पाहून मला आनंदाबरोबर थोडी चिंताहि वाटते. हा ग्रंथसंग्रह सार्वजनिक उपयोगासाठींच मिळावा अशी माझी इच्छा आहे आणि आपल्या पुणें विद्यापीठाकडे ही इच्छा मी कळवून ठेविली आहे. तथापि मी जीवमान आहे तोंवर तो माझ्याभोंवतीं असणें अवश्य आहे. 'जीवनावेगळी मासोळी। तुका तैसा तळमळी' अशी नाहींतर माझी अवस्था होईल! दुसरी इच्छा एवढीच कीं हा तो तसाच सांभाळला जावा, त्याचें निदान रक्षण व्हावें. नाहींपेक्षां चांगले चांगले विद्वानहि 'हें कशाला? तें कशाला?' अशा शंका काढून संग्रहाचा भार हलका करण्यास प्रवृत्त होतात. मी ज्या ज्या पुस्तकपुस्तिका-पत्रकादिकांचा संग्रह केला आहे त्यांतील प्रत्येक लहानसहान वस्तूच्या संग्रहाच्या पाठीमागें कांहीं कारण आहे. त्यांत एखादें चिनी किंवा जपानी किंवा जर्मन वा इतालियन् पुस्तकहि आढळेल. कदाचित् तें फार प्राचीन झाल्यामुळें नित्योपयोगाच्या दृष्टीनें उपयुक्त नसेलहि. तथापि प्रासंगिक वा विशेषाभ्यासाला त्याचा उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं. उदाहरणार्थ माझ्या संग्रहीं पुढील दोन ग्रंथ आहेत—

एकाचें नांव—

ॲन् युनिव्हर्सल मिलिटरी डिक्शनरि; [ इंग्लिश ॲन्ड फ्रेंच ] कर्ता—चार्लस जेम्स्. प्रकाशन—इ. स. १८१६. आवृत्ति—चौथी. पृष्ठें—१००५.

दुसरें असें—

ए ट्रीटाइज् एक्सप्लेनेटरी ऑफ् ए न्यू सिस्टिम् ऑफ् नेव्हल्, मिलि[illegible] पोलिटिकल् टेलिग्रॅफिक् कम्युनिकेशन्. ( साकृति व सचित्र )

कर्ता—जॉन् मॅक्डोनल्ड्. प्रकाशन—इ. स. १८१७. पृष्ठें—दिलेलीं नाहींत; पण स्थूलपणें १००० वर सहज भरतील. भाषा—इंग्रजी.

जित भारतीय आणि जेते इंग्रज यांच्या यौद्धिक शास्त्रीय ज्ञानाच्या बलाबलांचा परामर्ष घेणारास हे ग्रंथ अभ्यासणें अत्यवश्य ठरेल. कारण या ग्रंथांची रचना मराठी राज्य, निदान पेशवाई सत्ता, नष्ट होण्याच्या वेळेचीच आहे. अशा सम-कालीन ग्रंथांचा उपयोग समकालीन तौलनिक ज्ञानमापनाला निःसंशय उपयोगी समजला पाहिजे.

पण हे ग्रंथ जुने सबब त्याज्य गणून त्यांचा संग्रह क्वचित्च केला जाईल. इतकेंच नव्हे, जर चुकूनमाकून ते कोठें संग्रहांत राहून गेले असतील तर तेथून त्यांचें उच्चाटन केलें जाईल. माझ्या कटु अनुभवावरूनच मी हें विधान आपणां तज्ञ ग्रंथपाल मंडळीसमोर आणि ग्रंथालय चालकांपुढें सहेतुक करीत आहे. एक शंखविद्येवरील जुना सचित्र इंग्रजी ग्रंथ मी आमच्या प्राणिशास्त्रीय अध्यापकांकडे पाठविला. किंमत थोडीच होती. पण ते तो नुसता फुकट ठेव-ण्यासहि नाकबूल झाले ! पुण्याचें सरकारी हायस्कूल जेव्हां बंद करण्यांत आलें त्यावेळीं तेथील ग्रंथालयांतील कित्येक जुने ग्रंथ जुन्या बाजारांत गेले ! शंभर सव्वाशें वर्षांचा संग्रह, पण त्यांतील अनेक दुष्प्राप्य ग्रंथांची अशी वाताहत झाली ! या काढून टाकलेल्या ग्रंथांत अत्यंत दुर्मिळ असे गणित विषयावरील युरोपियन ग्रंथ अखेर रँ. श्री. अप्पासाहेब परांजपे यांचे हातीं लागले तेव्हां कैक वर्षे प्रयत्न करून न मिळणारे दुष्प्राप्य ग्रंथ मिळाल्यानें त्यांस अत्यंत हर्ष झाला ! दुर्दशेच्या अशा कथा एकत्रित केल्या तर त्यांची महाभारताएवढी मोठी विलापिका सहज होऊन जाईल !

आपले आभार मानून अलिबागकरांचें अभिनंदन करण्याचें सोडून मी ‘ विलाप—रस ’ आळविण्यानेंच प्रारंभ केला हें विचित्र खरेंच; परंतु वस्तुस्थितीच तशी नाहीं काय ?

आपल्या देशांत अद्यापि बहुसंख्य जनता निरक्षर आहे, आपल्यापाशीं ग्रंथा-लयाच्या पाणपोया उघडणारे कार्नेजी कुलांतील धनिक नाहींत, आपल्या ग्रंथ-

पालांच्या योगक्षेमाची व शाश्वतीची नीट व्यवस्था अद्यापि लागावयाची आहे, असा सर्व विलापच आपणाला या परिषदांतून करावा लागतो. आज या तिसऱ्या परिषदेंतहि आपलें हें दुर्भाग्य संपल्याचें आपणास घोषित करतां येईल काय? मग माझा तरी उपाय काय? एकाकाळीं आपल्या या प्रिय भारतभूमींत मोठालीं ग्रंथालयें होतीं आणि ग्रंथपालहि होते आणि त्यांच्या योगक्षेमाची व्यवस्थाहि सन्मानाची होती. ग्रंथालयतत्त्वज्ञानाचे आपले कर्ते अध्वर्यु माझे मित्र श्री. रंगनाथन् यांनीं आपल्या सुप्रसिद्ध 'पंचिकें'त–( फाइव्ह लॉज् पृ. ५७ ) वाडीजवळील नागाई येथील शिलालेखाचा दिलेला पुरावा आपल्या स्मरणांत असेलच ! चालुक्य राजा राय नारायण याचा सेनापती आणि अमात्य मधुसूदन यानें शके ९८० ( इ. स. १०५९ ) मध्यें एक वेदशास्त्रशाळा ' अरुवत्थु कंवद गुडी ' नांवाच्या देऊळ-गांवीं स्थापिली. त्यांत सहा सरस्वतीभांडारिकांची योजना केलेली होती. या भांडारिकांकडेच ग्रंथपालनाचें कार्य सोंपविलेलें होतें आणि त्यांचा परामर्षहि अध्यापकांच्या मापानें करून दिलेला होता !

नागाई येथील पाठशाळेप्रमाणें अनेक पाठशाळा प्राचीन भारतांत होत्या. तेथें मोठाले हस्तलिखित संग्रह होते आणि तेथेंहि ज्याप्रमाणें मिसर देशांतील फाराहोंच्या पदरीं कॅलिमॅकससारखे ग्रंथपाल हजारों वर्षांपूर्वी होते त्याप्रमाणेंच कोणी धर्मपाल, यशपाल, असे आमच्याकडेहि 'पुस्तकागारां'चे 'पुस्तपाल' होऊन गेले असलेच पाहिजेत. आपण हें सदैव लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं आपला थोर भारतदेश हा एक विद्यावंतांचा देश आहे. येथें विद्येची नवी प्रतिष्ठापना करावयाची नसून नव्या विद्येची प्रतिष्ठापना करावयाची आहे.

भोज, विक्रमादिकांपासून अलिकडच्या काळांत तंजावरकर शरभोजी महाराज आणि बडोदेकर सयाजीराव महाराज यांच्या काळापर्यंत विद्येचा आणि विद्यावंतांचा प्रतिपाळ आम्ही करीत आलों आहोंत. अलिकडील कित्येक शतकांत आमच्या पाश्चिमात्य बंधूंनीं विद्या-विज्ञानांच्या क्षेत्रांत जी स्पृहणीय प्रगति केली आहे तीपासून जेवढा लाभ आपल्याला करून घेण्यासारखा तेवढा सर्व आपण करून घेतला पाहिजे. ग्रंथपालनविद्या आणि ग्रंथपालनकला या दोन्हींच्या अभिवृद्धीची पाश्चिमात्यांनीं पराकाष्ठा केली आहे. पाश्चिमात्यांच्या या प्रयत्नांची माहिती आपणांस नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. अलिकडे मराठी ग्रंथालय संघ, कुलाबा जिल्हा वाचनालय संघ प्रकाशन, पुणें ग्रंथालय संघ, पूजाप्रकाशन, वगैरे संस्था यांच्या

द्वारें प्रसिद्ध झालेलीं किंवा स्वतंत्रपणें कै. विनायक कोंडदेव ओक, कै. जनार्दन सखाराम कुडाळकर, कै. रा. गो. कानडे, श्री. रघुनाथ शतानंद पारखी, श्री. शंकर गणेश दाते, श्री. वा. पु. कोल्हटकर, श्री. कृ. शं. हिंगवे, श्री. त्र्यं. दि. वाकनीस, श्री. वि. कृ. जोशी: वगैरे लेखकांनीं लिहिलेलीं ग्रंथालयांचें महत्त्व आणि शास्त्रीय वर्गीकरण वगैरे विषयांचें विवेचन करणारीं अत्यंत उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. ही फार संतोषाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. यांतील पंचामृत आणि पंचारती यासारख्या ग्रंथांत श्री. प्रियोळकर प्रभृति सूक्ष्मदृष्टि आणि मार्मिक विद्वानांचीं भाषणें आणि लेख संग्रहीत केलेले सांपडतात. हें सर्व साहित्य अत्यंत मार्गदर्शक आणि अभ्यसनीय असें आहे. ठाणें, मुंबई, पुणें वगैरे ठिकाणीं गेल्या पन्नास साठ वर्षांत मराठी ग्रंथालयांची स्थापना आणि जोपासना किती कष्टानें आणि चिकाटीनें करण्यांत आली हें आपणां सर्वांस विदित आहेच. गुर्जराधिपति कै. सयाजीराव महाराज यांनीं ग्रंथालय-प्रसाराच्या कामीं जी महनीय कामगिरी केली ती अखिल भारतीयांच्या आदरास पात्र झालेली आहे. आणि या कामगिरीचा वारसा सांप्रत मुंबई राज्याकडे आलेला आहे. आणि बडोदा राज्याचे ग्रंथालयाधिकारी यांच्याकडेच मुंबई राज्यांतील ग्रंथालयांचें नियमन सोपविण्यांत आलें आहे. हाही योगायोग लक्षांत ठेवण्यासारखा आहे. महाराष्ट्राची ही कामगिरी आणि तिचा स्फूर्तिप्रद इतिहास कोणासही अभिमानास्पद आणि संतोषावह झाल्याशिवाय राहाणार नाहीं. ज्या अलिबाग नगरींत आपण आतां जमलों आहोंत तीहि या ग्रंथालयविषयक चळवळीचें एक जागतें आणि जिवंत केंद्र आहे. अशा परिस्थितींत आपण आपल्या पुढील प्रगतीचे टप्पे काळजीपूर्वक, सर्वांच्या सहकारानें ठरवून पुढचीं पावलें टाकलीं पाहिजेत हें उघड आहे. या कामीं मला कांहीं अल्पस्वल्प साहाय्य करतां आल्यास, निदान विचाराच्या रूपानें, तें आपणासारख्या अनुभवी आणि कळकळीच्या कार्यकर्त्यांपुढें सादर करावें या दृष्टीनें मी पुढें कांहीं विचार मांडीत आहे. त्यांची ग्राह्याग्राह्यता ठरविणें आपणाकडे आहे.

संयुक्त महाराष्ट्र कायद्यानें स्थापित करणें ज्यांच्या हातीं आहे ते आपलें कर्तव्य केव्हां आणि कसें करतील तें करोत. आपण आपल्या मनांत त्याची स्थापना निश्चितपणें करून त्याप्रमाणें आपलीं कार्यें वाढीस लावलीं पाहिजेत. आपला महाराष्ट्र ग्रंथालय संघ आहे. अर्थातच अखिल महाराष्ट्र ही आपल्या कार्याची

क्षेत्रमर्यादा आहे. या क्षेत्र मर्यादेसाठीं आपण प्रथम आपल्या ध्येयाचें एक शेवटचें टोंक ठरवूं. माझ्या दृष्टीनें सकल महाराष्ट्राकरतां आणि महाराष्ट्रीयांकरतां महाराष्ट्रांत महाराष्ट्राचें एक महत्तम राष्ट्रीय ग्रंथालय—बिब्लिओथेका नासिओनाल—स्थापन करणें हें तें ध्येय असावें. या महत्तम महाराष्ट्रीय ग्रंथालयांत पृथ्वीवरील जेवढी ग्रंथसंपत्ति संग्रहीत करतां येईल तेवढी संग्रहीत केली जावी. हें ध्येय संपूर्ण सांगतेला गेलें असें कधींच होणार नाहीं. वाढत्या क्षितिजाप्रमाणें तें नेहमींच दूर दूर पळत जाईल. तथापि आपण प्रयत्नशील राहून त्याचा पाठलाग सोडतां कामा नाहीं.

आकड्यांमध्यें बोलावयाचें झाल्यास या ध्येयाची सिद्धि म्हणजे लक्षावधि पुस्तकें एकत्र करणें, सांभाळणें आणि त्यांची देवघेव करणें असा होतो आणि खर्चाच्या दृष्टीनें याचा हिशोब लक्षांतच करावा लागेल हेंही उघड आहे. हें नुसतें ऐकतांना कोणाला सहज म्हणतां येईल कीं उचलली जीभ आणि लावली टाळ्याला म्हणून आणि हें जाणूनही जीभ उचलून मी हें बोलत आहे. महाराष्ट्र जर ज्ञान-संपन्न करावयाचा असेल तर अशा ग्रंथालयाची जोड दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. प्राप्त परिस्थितींत या ध्येयसिद्धिसाठीं वाटचाल आरंभल्यास, न जाणो, एखादें शतकही या ध्येयाला प्रत्यक्ष आकार देण्यांत खर्च होईल. आणि हीं कामें अशींच असतात. निष्ठावंतांनीं पाया भरावा, दूरवर दृष्टी ठेवावी, हातीं असलेल्या साधनांचा भरपूर उपयोग करावा म्हणजे दोन हस्तक आणि एक मस्तक एवढयाशा भांडवलावर आरंभलेल्या ध्येयाच्या बीजाला अंकुर फुटून डंवरलेल्या वटवृक्षाचें भव्य स्वरूप त्याला कालगतीनें प्राप्त झाल्याशिवाय राहात नाहीं. निष्ठेच्या खताचा भरपूर पुरवठा मात्र कधीं कमी पडूं देतां कामा नये.

महाराष्ट्राला ज्ञानसंपन्न करणें म्हटलें तर मराठी भाषा हेंच त्याचें प्रमुख साधन राहील. आणि मराठी भाषेमध्यें सगळ्या महाराष्ट्राला ज्ञानसंपन्न करण्याचें सामर्थ्य संपूर्णपणें विकसित व्हावयाचें असेल तर मराठी भाषा हीच ज्ञानवहनाचें मुख्य साधन म्हणून अवलंबिली पाहिजे. अलिकडे आमच्या कित्येक मुत्सद्यांच्या मनांत मराठी भाषेला जिल्हाबंधनाची वई घालावी आणि वईपलीकडील मैदान हिंदी भाषेला मोकळें करावें असा एक गोंडस विचार आला आहे. पण या विचारांत मराठी भाषेला रक्तक्षय लागण्याची स्वच्छ सोय आहे हें थोडा विचार केला असतां लक्षांत येण्यास अडचण पडूं नये. या प्रकरणीं मुंबई उपनगर व ठाणेंजिल्हा

वाचनालय परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाचे (सन१९४५) अध्यक्ष श्री. बा. गं. खेर यांच्या पुढील मननीय विचारांची मी आपणास आठवण देतो. “ भाषावार प्रांतरचना व दर एक मुख्य भाषा असलेल्या प्रांतांत त्या भाषेची युनिव्हर्सिटी स्थापन करणें जरुर आहे. महाराष्ट्र, गुजरात व कानडी भाषा शिक्षणाचें माध्यम असलेल्या युनिव्हर्सिट्या स्थापन झाल्याशिवाय सार्वत्रिक ज्ञानप्रसार होणें कठिण आहे. या भाषा शिक्षणाचें माध्यम करावयाचें झाल्यास त्यांतून सर्व शिक्षण देतां येईल असे ग्रंथ तयार झाले पाहिजेत. आपणास हें काम प्रत्यक्ष हातांत घेता आलें नाहीं तरी त्याचें महत्त्व ओळखून त्यास पोषक अशा सर्व प्रवृत्ती आपण केल्या पाहिजेत. त्यायोगें जनतेंत सर्वत्र ज्ञानप्रसार करण्याचे कार्यास चालना मिळणार आहे. उच्च शिक्षणाचें माध्यम सध्या इंग्रजी भाषा असल्यामुळें ज्ञान जनतेपर्यंत पोचूं शकत नाहीं. शिक्षणाचें माध्यम मातृभाषाच असली पाहिजे हें तत्त्व आतां सार्जंट रिपोर्टनेंच नव्हे तर इतर प्रख्यात शिक्षणतज्ञांनीं मान्य केलेलें आहे. याचा परिणाम ग्रंथरचना वाढण्यांत होईल व लायब्ररी चळवळीस त्यामुळें खूप जोर येईल.” ( पंचारती पृष्ठ ६२ ).

श्री. खेर यांनीं काढलेले वर दिलेले उद्गार सदैव ध्यानांत ठेवण्यासारखे व अनुसरण्यासारखे आहेत. बदल करण्याजोगे अपसिद्धांत त्यांत नाहींत. म्हणून आपण तेंच प्रमाण मानून त्याप्रमाणें आपली कार्यें चालविलीं पाहिजेत. जिल्ह्याच्या पिंजऱ्यांत मराठी भाषेला बांधून ठेवण्याचा उपक्रम करणारांच्या आपण लक्षांत आणून दिलें पाहिजे कीं ती तेथें कोंडून राहाण्यास कधींच इच्छिणार नाहीं. मनूचा मासा जसा मोठा होत गेला तशी ती जिल्ह्याचे पिंजरे फोडून दशदिशांना आक्रमून टाकल्याशिवाय रहाणार नाहीं. तिच्या कुळीचा हा स्वभाव ज्ञानेश्वरापासून मोरोपंतापर्यंत सर्वांनीं उद्घोषून सांगितला आहे. मोरोपंतांच्या आर्यांविषयीं पंढरपूरकर प्रल्हाद बडवे जें म्हणाले तें याची साक्ष देईल—

ज्या उपजतांचि गेल्या काशी–रामेश्वरा नमायाला ।
आर्यांना प्रौढपणें जगतीतल हें पुरें न मायाला ॥

मराठी ग्रंथालयांचे अभिमान्यांनो आणि सेवकांनो, तुम्हांला एवढा इशारा बस होईल असें मी समजतो. मराठी भाषेंत आणि मराठी भाषेंतून सर्वोच्च ज्ञानाचा प्रवाह जर अखंडपणें आणि अनिर्बंधपणें खळखळत राहिला नाहीं तर आपलीं वाचनालयें आणि ग्रंथालयें स्थापण्याचें आणि त्यांच्या•

साठीं कष्ट करण्याचें कांहींच विशेष कारण उरत नाहीं. हें आणखी निराळें फोडून सांगावयास पाहिजे असें नाहीं. जिल्हावेंबनी तत्त्वज्ञान आपण गृहीत केलें तर आपण सांप्रत जी कित्येक हजार मराठी ग्रंथांची आकडेमोड करतां आणि त्यांच्या वर्गीकरणासाठीं द्विबिंदु, चतुर्बिंदु योजनांचे पट तयार करीत असता तोच आपला क्रम निरर्थक आणि अतिक्रमणाचा ठरेल. मराठी ग्रंथ मोजण्याचें आपलें गणित, आणि आपलें वर्गीकरण मग आपल्याला पुष्कळच आटोपशीर करावें लागेल. किंबहुना तो खटाटोपही आपण सोडल्यास फार बिघडणार नाहीं.

पण मी असें समजतो कीं ही परिषद आपण विसर्जनासाठीं बोलावली नसून संवर्धनासाठींच बोलावली आहे आणि तें संवर्धन करावयाचें असेल तर वर निर्दिष्ट केलेलें ध्येय आपण अंगीकारिलें पाहिजे. त्यांत घरसोड किंवा डंडाळितपणा कामीं यावयाचा नाहीं.

व्यक्तिकृत ग्रंथसंग्रह हेच सार्वजनिक ग्रंथसंग्रहांचे पूर्वज होत आणि अद्यापि व्यक्तिकृत ग्रंथसंग्रह चालूच आहेत, आणि यद्यपि सर्व सुखसोयींनीं युक्त आणि संपन्न अशीं सार्वजनिक ग्रंथालयें आपण चालविलीं तरी स्वतःचें ग्रंथसंग्रहालय टेवण्याचा हव्यास कमी पडणार नाहीं. उलट तो एका परीनें वाढीसच लागेल. स्वतःच्या संग्रहांतील ग्रंथ स्वतःच्या सोईनें, अभिरुचीनें आणि आवश्यकतेप्रमाणें दिवसारात्रीं वाटेल तेव्हां वापरतां येतात. तसें सार्वजनिक ग्रंथालयाचें संभवत नाहीं. आणि खाजगी ग्रंथसंग्रहांची वाढच खुंटेल तर ग्रंथप्रकाशनच थंडावेल !

आज खाजगी ग्रंथालयांची आपण विशेष दखल घेत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. परंतु ज्याप्रमाणें खाजगी असली तरी एखादी कलाकृती तिच्या अनुपम सौंदर्यामुळें समस्त राष्ट्रीय किंवा सामाजिक महत्त्वाची ठरते आणि तिच्यावर राष्ट्राचा किंवा समाजाचा एक प्रकारचा अधिकार उत्पन्न होऊं शकतो, तोच न्याय खाजगी किंवा व्यक्तिगत ग्रंथसंग्रहालाहि लागू करणें अयोग्य ठरणार नाहीं. अर्थात ग्रंथालय खाजगी आहे या सबबीवर तें आपल्या उपेक्षेचा विषय होतां कामा नये. उलटपक्षीं खाजगी ग्रंथसंग्रह करणाऱ्याला भय वाटेल, तो त्या कामीं उदासीन राहील किंवा उबगेल असेंहि कांहीं आपण करतां कामा नये. असा हा दुहेरी पेंच आहे. तथापि आवश्यक चातुर्याच्या व कौशल्याच्या आश्रयानें तो सुटण्यासारखा आहे.

तूर्तपक्षीं खाजगी किंवा व्यक्तिगत अशा मातबर ग्रंथसंग्रहांचा शोध लावून

त्यांची नोंद केली पाहिजे. मग त्या संग्रहाधिपतीकडे पायरव चालू ठेविली पाहिजे आणि असे उपाय योजिले पाहिजेत कीं जेणेंकरून तो ग्रंथसंग्रह त्या धन्याचे पश्चात् कोणत्या तरी रूपानें सुरक्षित राहील. तो जर सार्वजनिक उपयोगार्थ मिळेल तर सर्वोत्तम पण तो कोणी वारसदारांनीं आपसांत वाटून घेतला किंवा फुटकळ विकला किंवा त्याला पाय फुटूं दिले तर ? या घटना टळतील असे प्रयत्न सर्वात्मना केले पाहिजेत. सरकारी धोरण आणि कायद्याची आखणी या धोरणसिद्धीला पोषक राहील अशी व्यवस्था झाली पाहिजे. मात्र अन्याय न होईल, 'कुठून हा संग्रह केला' असा पश्चात्ताप कोणास न वाटेल असाच सर्व बनाव घडवून आणिला पाहिजे आणि या सर्व कृत्यांचा परिणाम वैयक्तिक ग्रंथसंग्रहांच्या हव्यासाला पुष्टि देणाराच होईल असें केलें पाहिजे.

तंजावरच्या विद्याभिलाषी, व 'नवविद्याकलानिधिशाले'चा चिरस्मरणीय श्रीशरभोजी महाराज भोसले यांनीं केलेला अपूर्व लिखितमुद्रित तामिळ मराठी इंग्रजी ग्रंथांचा संग्रह आज आपल्या दृष्टीस अभंग पडतो. याचें कारण एकच कीं करवीरकर, तंजावरकर प्रभृति भोसले यांचा वाद पडला असता सर्व वाद्यांना सुबुद्धि सुचवून हा शरभोजीसंग्रह व एक लक्ष रुपये ह्यावरील वाद सर्व वाद्यांकडून सोडून देवविला ! (१९१८). पण याच्या उलट कादंबरीकाराग्रणी कै. हरि नारायण आपटे यांच्या पश्चात् त्यांच्या उर्वरित अपूर्व सग्रहाची दुर्दशा चांगल्या चांगल्या मार्मिक व ज्ञानी समजल्या गेलेल्या मंडळीकडून उडालेली मी समक्षच अनुभविलेली आहे ! तीच गत सुविख्यात भारतीय कीर्तीचे परिगणनाप्रवीण कै. रावब. गणेश व्यंकटेश जोशी यांच्या ग्रंथसंग्रहाची झालेलीहि पाहिली ! या विद्वच्छ्रेष्ठानें आपला अपूर्व ग्रंथसंग्रह पुण्यांतील भाटवडेकरांच्या वाड्यांतील मेहुणपुऱ्याच्या कोपऱ्यावरील आपल्या बिऱ्हाडीं इ. स. १९१०–११ मध्यें सर्व अभ्यासू जनांस मुक्तद्वार ठेविला होता. अशांच्या संग्रहाचीहि कदर झाली नाहीं ! परवांच महाराष्ट्र भाषेचे नितांत अभिमानी सेवक नाना पावगी यांनीं जीवापाड कष्टानें जपून ठेवलेला ग्रंथसंग्रह बाजारांत फुटकळ विक्रीला आलेला पाहिला ! इतकेंच कशाला, माझे सहकारी प्रख्यात इतिहास संशोधक आणि गणकाग्रणी कै. दत्तोपंत आपटे यांचा लहानसाच पण वेचक संग्रह असाच पुस्तकविक्रयांकडे जाऊन पडला ! दत्तोपंतांच्या निवडक ग्रंथांत किंवा गणपतराव जोशी यांच्या अनेक ग्रंथांत त्यांच्या हातचीं टिपणें, टीका व शोध असत ! असे कांहीं जुने ग्रंथ पुनः संग्रहून ठेविले आहेत.

एवढे लोकप्रिय राम गणेश गडकरी पण त्यांची तीच कथा. त्यांच्या हातचीं टिपणें असलेल्या मजजवळील पंचदशीवरून कळून येईल. काल परवांच कारवाराकडील एका अध्यात्मप्रेमी मराठा गृहस्थाचा बहुसाल ग्रंथसंग्रह बाजारांत आला आहे ! अशा एक ना दोन गोष्टी ! किती सांगाव्या ? यावर आपण जर कांहीं उपाय करणार नाहीं आणि या दुर्घटना घडणार नाहींत असा बंदोबस्त करणार नाहीं तर आपल्या जमण्याचा व परिषदांचा काय उपयोग ? हौदांत वरून नळ सोडला आणि तळांतून पाणी जाण्याचा मार्ग मोकळा ठेवला तर हौद कसा भरेल ?

या दुर्घटना टाळण्यासाठीं आणि वर सांगितलेलें आपलें महत्तम राष्ट्रीय ग्रंथालयाचें ध्येय साध्य करण्याचे दृष्टीनें मी माझ्या मनांत आलेल्या कांहीं युक्ती येथें मांडतो. आपल्यासारख्या परिषदांचें बळ मुख्यतः सहकार्यप्रवृत्ति हेंच होय. या बळाचा जास्तींत जास्त अविष्कार आपण करून दाखविला पाहिजे. अशक्य तें शक्य करून दाखविण्याचा चमत्कार या सहकाराच्या अविष्कारानें घडून येईल यांत मला कसलीही शंका नाहीं.

प्रथम एक सूत्र सांगतो तें असें कीं यापुढें एकही पुस्तक आपण सहजासहजीं नष्ट होऊं द्यावयाचें नाहीं. चुलींत, बंबांत, कचऱ्याच्या पेटींत किंवा रद्दींत जाऊं द्यावयाचें नाहीं. माझ्यासारख्या रद्दी चाळणाऱ्या छांदिष्टाला रद्दींतील रत्नें पुष्कळ मिळालीं आहेत. प्राचीन कागदच अशा रीतीनें हातीं आले आहेत असें नसून कै. नामदार गोखले यांनीं आपल्या आयुष्यांतील एका आणीबाणीच्या प्रसंगीं आपल्या मनांतील हृदत आपले तरुण मित्र आणि सहकारी श्री. आप्पासाहेब परांजपे यांना ज्यांत लिहून कळविले होते असें बहुमोल पत्र एका चिवडेवाल्याच्या रद्दींतून आमच्या एका मित्रानें नुकतेंच सोडवून आणलेलें आहे. म्हणून यापुढें फुकटाफाकटी आपलें वाङ्मयधन नष्ट होणार नाहीं याविषयीं आपण फार जागृत राहिलें पाहिजे. एक मनाचा निश्चय आणि आपणा सर्वांचा त्या प्रकरणीं सहकार लाभेल तर शेकडो रुपये खर्चूनही जी गोष्ट होणार नाहीं ती गोष्ट जवळ जवळ विनखर्चीं पदरांत पडेल.

मला माहीत आहे कीं आपली ही परिषद महाराष्ट्र ग्रंथालयांची आहे. तेव्हां साहजिकच आपल्या कार्यकर्त्यांचा जर असा समज झाला कीं आपण फक्त मराठी पुस्तकांचाच परामर्श घेणार तर त्यांत कांहीं वावगें नाहीं. पण यांत एक

धोका असा येतो कीं सहजासहजीं हातीं आलेली बंगाली, कानडी, गुजराती, उर्दू किंवा फ्रेंच, जर्मन, हिब्रू अशीं पुस्तकें आपण घेणार नाहीं. आणि हा बिनवारशी माल वर दाखवलेल्या चुली आणि बंब वगैरेंच्या लोकाप्रत पावून उद्धार गतीला जाईल. यासाठीं सावध राहिलें पाहिजे. याला पैसा नको; योजकता आणि जागरूकता पाहिजे.

यावर असा आक्षेप येईल कीं होय, तुमचें सर्व म्हणणें खरें आहे. पण जेथें मराठी पुस्तकेंच ठेवावयास आमच्या जवळ जागा नाहीं आणि आम्हांला स्वतः-लाही बसण्यास जेथें भरपूर सोय नाहीं तेथें हें लटांबर आम्हीं कसें पत्करावें ? अडचणीवर तोड असतेच. सहकाराचा आश्रय केल्यास अडचणी दिसतात तेवढया कठिण ठरणार नाहींत. कांहींही करून हातीं आलेलें असें धन थोडा वेळ कोठें तरी अडगळून ठेवावें. आपण जर एखाद्या सासवडच्या पुरंदऱ्यांच्या रिकाम्या वाड्याच्या विस्तीर्ण वळदासारखीं आपल्या महाराष्ट्रांत गांवोगांवीं आढळणारीं वळदें या कामासाठीं मिळवून उपयोगांत आणलीं आणि तेथें या निर्वासितांची सोय केली तर बंबांत जळून जाण्यापेक्षां वळदांत सुखानें घोरत पडणें त्यांना परवडेल. मग सोईप्रमाणें आणि सवडीप्रमाणें हे गठ्ठे सोडून त्यांची विल्हे करतां येईल. नंतर जर आपण कांहीं निवडक ठिकाणीं या विल्हे केलेल्या मालाचा एक एक भाग विषयवारीनें वाटून संग्रहार्थ पाठवून दिला तर कांहीं काळ त्या स्थितींत जाईल आणि जेव्हां आपली आणखी पुढली तयारी होईल त्या वेळेला त्याची योग्य आणि शास्त्रीय अशी व्यवस्था आपण लावूं शकूं.

कुणाकडे आणि कोठें काय मिळेल याचा कांहींच अदमास सांगतां येत नाहीं. आणि मी तर मिळेल त्याचा संग्रह करावा, कांहीं टाकूं नये, असा दंडक घालूं पाहात आहे. कारण मला महत्तम राष्ट्रीय ग्रंथालय केव्हांतरी सिद्ध करावयाचें आहे. मी आणि माझा देश पैशाच्या बळांत फार कमी आहो. म्हणूनच अशी ग्रंथभिक्षा अंगीकारण्यास मी आपणास प्रवृत्त होण्यास सुचवीत आहे. एका जागीं सर्व परकीय भाषांतील ग्रंथ तर दुसऱ्या जागीं सर्व प्राचीन भाषांतील ग्रंथ आणि तिसऱ्या जागीं केवळ गणित-ज्योतिषाचे ग्रंथ अशी तात्पुरती वाटणी करून मी कांहीं वर्षे अडचण निभावून नेईन. पण ग्रंथ नष्ट होऊं देणार नाहीं. कारण मी ओळखून आहे कीं या मार्गानें माझ्या महत्तम राष्ट्रीय ग्रंथालयासाठीं

८८०८

लाख पन्नास हजार ग्रंथ दहा पांच वर्षांत मी सहज जमा करीन. तुम्हीं सर्वांनीं सहकारी झालें पाहिजे; मग या ग्रंथांत एखाद्या पुस्तकाच्या अनेक प्रतीसुद्धां असूं शकतील त्याही मी टाकून देणार नाहीं. सोईनें वाटून देईन. एकांतिक दिसणाऱ्या अशा धोरणाचा असा पुरस्कार मी जाणूनबुजून करीत आहे. कारण प्राप्त परि-स्थितींत भगवन्नामजपानें जसा मोक्ष सुलभ होतो तसा माझ्या ध्येयसिद्धीचा मोक्ष या उपायानें सुलभ होणार आहे.

ग्रंथांचा उपयोग कोणास कसा होतो आणि कसा करावा लागतो याला कांहीं सीमा नाहीं. आंतील मजकूराचाच अभ्यास होऊं शकतो असें नसून बांधणी, शाई, आकार, छपाई, कागद, चित्रीकरण, सजावट, प्रकाशन-स्थळ, प्रकाशक, अशा शेकडो बाबींचा स्वतंत्र अभ्यास होऊं शकतो. अशा अभ्यासाला सर्व आवृ-त्यांची गरज असते. छापण्याची कला निघाल्यापासून कोणा ॲडिसन-जॉन्सन किंवा डांटे-कालिदास किंवा गीता-बायबल यांना मुद्रणसंस्कार केव्हां, कोठें कोठें, कसकसे घडले त्याचा अभ्यास करण्यासाठीं त्या त्या वेळीं छापलेली जितकी सामुग्री मला प्रत्यक्ष पाहावयास मिळेल तितका माझ्या अभ्यासास मला जिवंत-पणा आणि प्रमाणभूतता आणतां येईल. याच दृष्टीनें मी इंग्लंडांत सुमारे अठरा-शेंच्या आसपास छापलेल्या ॲडिसन, स्टील, किंवा जॉन्सन यांच्या ग्रंथांच्या जुन्या आवृत्त्या मिळाल्या त्यांचा संग्रह केला आहे. वानगीदाखल कांहीं येथेंही आपणास दाखविण्याकरितां आणला आहे. हे ग्रंथ वाङ्मयाचे असले आणि मी इतिहासाचा शिक्षक असलो तरी मला त्यांचा फार उपयोग आहे. एका अंगाला हे ग्रंथ ठेवीन आणि दुसऱ्या अंगाला हे ग्रंथ छापले गेले त्याच वेळीं आपलें कर्तृत्व गाजवीत असलेले माझे मराठी पूर्वज यांची ग्रंथविषयक हालचाल समजण्यासाठीं त्यांनीं कामावर लावलेल्या लेखकांकडून आपल्या उपयोगासाठीं हातीं लिहून घेतलेले अनेक पुराणे ग्रंथ तुलनेसाठीं मी वरील इंग्रजी ग्रंथांच्या शेजारी ठेवीन. तेव्हां मला पक्का भरवसा आहे कीं मुद्रणकलेचा इंग्लंडादि देशांवर पडलेला प्रभाव आणि आमच्या इकडील त्याच्या अभावाची अवस्था यांचा जसा ठसा मला माझ्या तरुण विद्यार्थ्यांच्या मनावर खोल आणि परिणामकारक तऱ्हेनें उठवितां येईल तसा दृश्य परिणाम केवळ सनावळ्या सांगून आणि रसपूर्ण प्रवचन करून मला कदापि करतां येणार नाहीं. मग असे हे जुने इंग्रजी ग्रंथ आणि त्यांच्या जुन्या आवृत्त्या त्याहूनही सरस अशा नव्या आवृत्त्या मिळत असतां संग्रहून ठेवावे असा जो आग्रह मी करीत

आहे. त्यांतील मर्म आपल्या ध्यानीं सहज येईल. आणखी एक उदाहरण देतों. इंग्रजी अंमल सुरू झाला तेव्हां महाराष्ट्रांत कर्नल जार्विस याच्या नेतृत्वाखालीं युरोपियन गणित विद्येचीं पुस्तकें मराठींत करविण्यांत आलीं. मूळ इंग्रजी ग्रंथ हट्टन प्रभृतींचे होते. त्यांचे मराठी तर्जुमे करण्यांत आले. या तर्जुम्यांची यथार्थ परीक्षा करावयाची तर हट्टन प्रभृतींचे शालोपयोगी गणित ग्रंथ पाहावयास मिळाले पाहिजेत. आमचीं मराठी पाठ्य पुस्तकें देखील अव्वलपासून अखेरपर्यंत सर्व आवृत्त्यांसुद्धां एकत्र संग्रहून ठेवलेलीं आढळत नाहींत. तेथें शंभर दीडशें वर्षांपूर्वींची आजच्या शिक्षणाला निरुपयोगी ठरलेली हट्टन प्रभृतींचीं पुस्तकें कोण, कशाला संग्रहून ठेवतो ? पण मग आमचा तो तांत्रिक अभ्यास कसा करावयाचा ? म्हणूनच मी सर्व संग्रहाचा अट्टाहासानें पक्षपात करीत आहे.

कांहीं जुन्या पुस्तकांवर तीं ज्यांस बक्षीस दिलीं त्यांचीं नांवें व तीं देणारांच्या सह्या वगैरे असलेल्या चिठ्ठ्या लावलेलीं पुस्तकें त्या दृष्टीनें संग्राह्य नव्हेत काय ? असे एक ना दोन शेकडो उपयोग होणार असल्यानें सर्व संग्रहाचा माझा पक्ष मला अगदीं बलवान वाटतो. कालांतरानें कोणी कसलेंहि मोल दिलें तरी दुर्मिळ ग्रंथ पाहावयासही मिळणार नाहींत. कोहिनूराच्या मोलानें अशा पुस्तकांचे सौदे अन्य देशांत झालेले आपण अधूनमधून वाचतो. तो एक छांदिष्टपणाचाच प्रकार नसून शैक्षणिक उपयुक्ततेचाही भाग त्यांत आहे हीही गोष्ट कोणी दृष्टिआड करूं नये.

मुद्रितांबरोबरच लिखितांचाही संग्रह सहजासहजीं हातीं आल्यास टाकूं नये असाही माझा आग्रह आहे. हातीं येतील तीं घ्यावीं आणि तीं आपणाकडे सोय नसल्यास लिखित–संग्रह–शाळाकडे पाठवावीं. पण टाकूं नये. कै. दादोबा पांडुरंग यांच्या 'माबाईच्या ओव्या' याचें हस्तलिखित–प्रियोळकर, पंचारती पृष्ठ १७— मी मुंबईच्या पायरस्त्यावरील गळाठ्यांतून हुडकून मातीमोलानें घेतलें. तें आज आपल्याला पाहण्यासाठीं बरोबर आणलें आहे. म्हणून अशा बहुमोल संपत्तीचाही त्याग आपण करूं नये. आणि तीविषयीं अलिप्तपणा ठेवून वागूं नये.

ध्येय निश्चित केल्यावर आणि सहकाराचा आश्रय करण्याचें ठरविल्यावर आपण नेमलेलें सहकारी मंडळ अधूनमधून जमत जाईल आणि झाल्या प्रगतीचें मोजमाप काढीत जाईल असा मला भरवसा आहे.

ग्रंथालयाची चलवळ आपणाकडे अलिकडेच सुरू झाली आहे. तिचा जो हाल मला शिक्षणखात्याच्या १९४९–५० च्या वार्षिक वृत्तांतांत आढळला. तो

आपल्या लक्षांत येण्यासाठीं कांहीं उपयुक्त कोष्टकावली मी शेवटीं परिशिष्टांत जोडल्या आहेत त्या आपण पहाव्या. आपल्या मुंबईच्या मध्यवर्ति ग्रंथालयासंबंधानें या वार्षिक वृत्तांतांत पुढील विधान आढळतें. ' इट इज क्लीअर दॅट दि सेंट्रल लायब्ररी, बॉंबे वॉझ दि लीस्ट सक्सेसफुल इन ॲट्रॅक्टिंग अँड एंगेजिंग दि अटेंशन ऑफ दि पब्लिक ' ( पृष्ठ १२९ ) आणि म्हणून या ग्रंथालयाचें आकर्षण आणि शोभिवंतपणा वाढवावा अशा प्रकारच्या सूचना वजनदार समित्यांनीं केल्याचें अहवाल सांगतो. आणि तोच अहवाल हेंही सांगतो कीं, खर्ची पडलेल्या दर रुपयामागें तालुका ग्रंथालयांत वाचकांची संख्या सर्वांत मोठी म्हणजे २६ अशी पडली तर ती या मध्यवर्ति ग्रंथालयांत केवळ $\frac{३}{१००}$ पडली. वजनदार समित्यांनीं सुचवलेले उपाय कदाचित् अमलांत आणले जातील असें भय मला वाटतें. या मध्यवर्ति वाचनालयाचें जातक वर्तवितांना दहा अकरा वर्षांपूर्वीं म्हणजे १९३९-४० मध्यें मुंबईच्या म्युनिसिपालिटीनें अगोदरच संशय व्यक्त केला होता कीं अशा ग्रंथालयाची मागणी मुंबईत फारशी दिसून न यावी. ( 'इन दि रिप्लाय टु आवर क्वेश्चनेअर रिसीव्हड् फ्रॉम दि बॉंबे म्युनिसिपॅलिटी डाउटस् हॅव बीन एक्स्प्रेस्ड ॲज टु व्हेदर ए सेंट्रल लायब्ररी वुइल बी मच इन डिमांड ॲट बॉंबे –ला. डे. क. रिपोर्ट. १९३९-४० पृष्ठ २५ ). वजनदार समित्यांना या संशयाची अद्यापही फारशी मातब्बरी वाटली नसावी असें त्याच्या आकर्षक सूचनांवरून वाटतें. पण सरकारी अहवालांतील वर सांगितलेली वस्तु-स्थिति ध्यानीं घेतली असतां वजनदार समित्यांपेक्षां विचारी समित्यांची योजना करून मग निर्णय घेणें अधिक सावधगिरीचें ठरेल. आपण तज्ञ मंडळींनीं या परिषदेंत सरकारला साह्यभूत होईल, असें कांहीं मार्गदर्शन केल्यास तें समयोचित ठरेल.

तालुका ग्रंथालयांच्या विषयीं समाजांत उत्सुकता दिसून येत असल्याचें अह-वालावरून दिसतें. ही उपयुक्तता अधिक वाढविण्यासाठीं या ग्रंथालयांतून पाठकांची योजना केल्यास लोकशिक्षणाचा इष्ट हेतु अधिक सिद्धीला जाईल. आपला बहुसंख्य समाज साक्षर नाहीं. पण म्हणून तो सुशिक्षित नाहीं असें समजणें माझ्या मतें मोठी चूक होईल. आमचा शेतकरी किंवा आमचे लोहार-चांभार आपापल्या कामांत पुष्कळच वाकबगार असल्याचें दिसून येतें. म्हणजे स्वकर्म शिक्षेंत ते परंपरेच्या बळावर बरेच शिक्षित आहेत असें म्हणतां येतें.

साक्षरतेनें त्यांची योग्यता अनेक पटीनें वाढेल हें खरें आहे आणि तसे प्रयत्न अवश्य चालू ठेवले पाहिजेत. पण माझ्या मतें लोकशिक्षणाचें सर्वसुलभ आणि सर्वश्रेष्ठ साधन 'श्रुति' हें आहे. म्हणूनच नवविधाभक्तीमध्यें श्रवणभक्तीला पहिलें स्थान दिलें आहे. आमच्या आद्य ग्रंथांना 'श्रुति' म्हणतात, त्यावरूनही हेंच मर्म प्रकट होतें. कै. खापर्डे यांनीं एक वेळ असें मार्मिक दिग्दर्शन केलेलें होतें कीं, इंग्रजींत साधारण विद्वानाला 'वेल्रेड' असें म्हणतात. तर आमच्या परंपरेंत आम्ही त्याला 'बहुश्रुत' म्हणतो. एतावता श्रुति हेंच लोकशिक्षणाचें सर्वाढय महासाधन आहे. या परात्पर साधनाचा प्रभाव रेडिओवरून नित्यशः कळून येत आहे. सर्व जनता साक्षर होईल तेव्हां होवो. पण जर जुन्या हरदास-पुराणिकांप्रमाणें या निरक्षर जनतेला वृत्तपत्रें आणि छोटीं छोटीं पुस्तकें कोणी पुनःपुन्हा ऐकवील तर कामाच्या द्वारें त्यांच्या ज्ञानबीजाचें उत्कृष्ट पोषण होईल. आणि आपला सारा समाज सुशिक्षित या संज्ञेला पात्र होईल. म्हणून ठिकठिकाणच्या वाचनालयांतून पाठकांची योजना करून निरक्षरांना ज्ञान श्रुति-गोचर केलें तर फारच मोठा लाभ पदरीं पडेल.

श्रुतीचा विषय निघालाच आहे. तेव्हां सरकारास एक आग्रहाची सूचना जनतेच्या पक्षपातानें करावयाची आहे. देशी भाषांतून रेडिओवरून जे सहस्रशः कार्यक्रम होतात, त्यांतील निवडक कार्यक्रमांना जर मुद्रित स्वरूप दिलें तर लोक-शिक्षणासाठीं उपयुक्त अशा वाङ्मयाचा पर्वत उभा राहील. तीच दृष्टी लागली म्हणजे कार्यक्रमांतही सुधारणा होईल. श्रुतिशिक्षण परिणामकारक होण्यासाठीं पुनःश्रवणाची फार आवश्यकता असते. याकामीं हे श्रुतमुद्रित साहित्य पुनः-संस्काराला पाठकांच्या द्वारें कार्यान्वित करतां येईल. सरकार या रेडियोसाहित्यावर कृपणासारखा मालकी हक्क ठेवून बसलें आहे. पण त्याला मुद्रितरूप देण्यासाठीं कांही हालचाल करीत नाहीं. मागितल्या परवानगीवरून जें फुटकळ प्रकाशन होतें तें हिशोबांत घेण्यासारखें नाहीं. तसा प्रयत्न बुद्धया केला पाहिजे. योजनापूर्वक तो चालविला पाहिजे. ग्रंथालयें, ग्रंथपाल, पाठक आणि रेडियो यांनीं सहकार्यानें चालल्यास फार चांगलें यश पदरीं पडेल. पठनकला ही वाढीस लागेल आणि कुशल पाठकांचा नवा लोकशिक्षक वर्ग निर्माण होईल.

ग्रंथालयांची जोपासना हें लोकशिक्षणाचें महत्वाचें अंग आहे. त्यांची उपयुक्तता वाढविण्यासाठीं युक्तिवंताला अनेक कल्पना सुचतील. महाराष्ट्राच्या

भूमिक्षेत्रांत ग्रंथालयांची वाटणी कोठें आणि कशी झाली आहे तें दाखविणारा या क्षेत्राचा एक प्रत्यक्ष नकाशा कोणी तयार केल्यास तो फार उपयोगी होईल. आपल्या कुलाबा जिल्ह्यांत शाळांची स्थापना कोठें आणि कशी झाली आहे तें सरकारी अहवालावरून परिशिष्टांत दाखविलें आहे. शाळा, ग्रंथालयें, लोकशिक्षण-समित्या, मजूर समित्या, विद्यापीठें आणि वृत्तपत्रें या सर्व साधनांचें बुद्धिपूर्वक नियोजन करून आणि त्यांना सहकाराच्या शृंखलेनें बद्ध करून कार्यक्रमाची आखणी झाल्यास तें अधिक श्रेयस्कर होईल. ग्रंथपालनशास्त्राचा अभ्यास झालाच पाहिजे. परंतु आपली परिस्थिति संपूर्णपणें लक्षांत घेऊन ग्रंथालयांचें लोण पुढें कसें नेतां नेईल हा विषय शास्त्रापेक्षां व्यवहारानेंच अधिक लवकर सोडवितां येईल. कै. डॉ. केतकर यांनीं ज्ञानकोशाचे बावीस खंड रचले आणि लोकशिक्षणाचा राजमार्ग तयार केला. परंतु त्याचा उपयोग नियोजनपूर्वक होत असल्याचें कोठेंच दिसून येत नाहीं. ग्रंथपालानें सर्व अभिरुचींच्या आणि सर्व पातळींच्या लोकांची भरपूर सेवा करावी असें 'पंचिका'कर्ते सांगतात. परंतु या प्रकारची सिद्धता ठेवण्यास त्यांनीं वाचन केव्हां करावें आणि कोठें करावें, तसेंच त्यांच्या योगक्षेमाची तजवीज काय असावी याचाही विचार लगोलग न झाल्यास परीक्षोत्तीर्ण ग्रंथपालही निरुपयोगी झाल्याशिवाय राहाणार नाहीं. याचा आपण विचार करावा आणि सरकारासही विचार करावयास लावावें. ज्याप्रमाणें आजकाळीं भौमिक, सामुद्रिक आणि वायवी सेनाविभाग नियोजनपूर्वक सहका-रानें आणि एकमेळानें चालवल्याशिवाय युद्धांत यशप्राप्ति होत नाहीं, त्याप्रमाणें विद्यापीठें, वृत्तपत्रें, ग्रंथालयें, शाळा आणि रेडियो यांचाही सहकारी एकमेळ केल्याशिवाय संपूर्ण यश पदरीं पडणार नाहीं. पुष्कळसा पैसा वाया जाईल. पाणी न जिरेल असे खापरी किंवा दगडी किंवा बंधचूर्णी नळ टाकल्यानें पाण्याची बचत होऊन शेतांत दलदल माजत नाहीं किंवा लोणा येत नाहीं, तद्वतच लोकशिक्षणाची साधनें विनगळवया पद्धतीनें एकमुखी करून वापरल्याशिवाय आपली प्रगति द्रुतगतीनें आणि निश्चयानें होणार नाहीं. एकट्या ग्रंथपालाच्यानें ग्रंथालयाचा संपूर्ण उपभोग जनतेस करून देववणार नाहीं. सर्वच सुशिक्षित जनतेंत ग्रंथपालपणाचा स्पर्श घडवून आणला पाहिजे. शिक्षक असो किंवा वरिष्ठ तपासनीस असो, जिल्हा-धिकारी असो किंवा ग्रामाधिकारी असो. ग्रंथालय आणि लोकशिक्षण यांचा निकट अन्योन्य संबंध त्यांच्या मनांत अल्पांशानें तरी उतरविण्याची योजना केली पाहिजे.

म्हणूनच आपले हेतु सत्वर सफळ होतील. आपली परिषद असें कांहीं व्यावहारिक नियोजन करील तर तिच्या कार्याचा प्रवाह निरंतर वाहता आणि वाढता राहील हें लक्षांत घेण्याची मी आपणास कळकळीची विनंति करतो. मी ग्रंथपाल नाहीं; ग्रंथालयाधिकारी नाहीं. सामान्य ग्रंथसंग्राहक आणि ग्रंथवाचक आहे. माझ्या अल्पशक्तीनुसार मी आपली सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. तो आपण गोड मानून घ्यावा.

अलिबाग
शनिवार ता. १५।१२।५१

## परिशिष्ट–१

मुंबई सरकारच्या शिक्षणविषयक वार्षिक वृत्तांत १९४९–५० वरून मुंबई राज्यांतील ग्रंथालयें व वाचनालयें.

### ग्रंथालयें

| चालक | स्थिर | फिरतीं | शाखा | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ सरकारी | २३ | १४ | ० | ३७ |
| २ डिस्ट्रिक्ट बोर्ड | ० | ० | ० | ० |
| ३ म्यु. बोर्ड | ४ | ० | ० | ४ |
| ४ खाजगी अ सरकारी मदतीचीं | ३२६७ | ४ | ० | ३२७१ |
| आ बिनमदतीचीं | २८ | ० | ० | २८ |
| | ३३२२ | १८ | ० | ३३४० |

टीप–वाचनालयें फक्त खाजगी (सरकारी मदतीनें) चालणारीं ४२२ होतीं. सरकारी, डि. बोर्ड, म्यु. व बिनमदतीचीं अजिबात नव्हतीं.

## परिशिष्ट–२

| | संस्थेंतील पुस्तक पत्रिकादिकांची संख्या | | १९४९-५० सालांतील पत्रपुस्तकादींची भरती | |
|---|---|---|---|---|
| चालक | स्थिर + | फिरतीं | स्थिर + | फिरतीं |
| १ सरकारी | २९९८ + | १७२ | ६४९ + | ० |
| २ डिस्ट्रिक्ट बोर्ड | ० | ० | ० + | ० |
| ३ म्यु. | १३७४८ | ० | ४१३ + | ० |
| ४ खाजगी अ | ३८६२९४ | १००५ | ७०३४१ + | १० |
| आ | २२७६ | ० | ६६९ + | ० |
| | ४०५२४६ + | ११७७ | ७२०७२ + | १० |

## परिशिष्ट—३

मुंबई राज्यांतील सरकारी संग्रहालयांना मिळालेली मदत—

| वर्ष | रॉयल एशियाटिक सोसायटी, मुंबई | गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद | महाराष्ट्र ग्रंथालय, पुणें | कर्नाटक विद्यावर्धक संघ, धारवाड |
|---|---|---|---|---|
| १९४६–४७ | ३०००० | १०००० | १०००० | १०००० |
| १९४७–४८ | ६५००० | १६००० | १९००० | १५००० |
| १९४८–४९ | ३७००० | १३००० | १३००० | १२००० |
| १९४९–५० | ३७००० | १३००० | १३००० | १२००० |

## परिशिष्ट—४

१९४९–५० मध्यें सरकारकडून ग्रंथालयांना देण्यांत आलेली मदत व ग्रंथालयांचा झालेला लोकोपयोग—

| ग्रंथालय प्रकार | सरकारी मदत | वर्षातील वाचन | पुस्तकांची देवघेव |
|---|---|---|---|
| १ मध्यवर्ति | ३७००० | १२७८ | —— |
| २ प्रादेशिक | ३८००० | १,१२,८५४ | ५५,५२५ |
| २० जिल्हा | ८१८३९ | ६,५५,५८६ | १,७३,८९५ |
| १०३ तालुका व पेटा | ७३४५५ | १८,९३,८६० | १,५२,३०० |
| १८७ | २,३०,२९४ | २६,६३,५७८ | ३,८१,७२० |

## परिशिष्ट—५

कुलाबा जिल्ह्यांत एकूण १९६३ लहानमोठीं गांवें आहेत, त्यांत १००० वर लोकवस्तीचीं २, ५०० ते १००० चीं ८२६, आणि ४०० हून कमी वस्तीचीं ११३५ आहेत. यांपैकीं ६६१ गांवांमध्यें शाळा आहेत. म्हणजे १३०२ गांवांना शाळा नाहींत.

६००

आनंद मुद्रणालय पुणें २.]